महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

गुरुवार ❖१६ जानेवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २०२ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# सेवाभाव हे प्रमाण मानून शासन कार्यरत

## - पंतप्रधान नरेंद्र मोदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/रायगड(प्रतिनिधी)

भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही निःस्वार्थी असते. आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचा मुख्य पाया सेवाभाव असून आपले सरकार हाच सेवाभाव ठेवून काम करीत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

भारताच्या सांस्कृतिक वारसाला चालना देण्याच्या वचनबद्धतेनुसार, पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खारघर येथील श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर या इस्कॉन प्रकल्पाचे लोकार्पण संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. नवी मुंबई मधील खारघर येथील नऊ एकर परिसरात वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश असून विश्वबंधुत्व, शांतता आणि सौहार्द वाढविणे, हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.



यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार हेमा मालिनी, इस्कॉन मंदिर मुख्य चिकित्सक सूरदास प्रभु उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी यांचे स्वागत मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू आणि खासदार हेमा मालिनी यांनी केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना पंतप्रधान श्री.मोदी म्हणाले की, आपला भारत देश विलक्षण आणि अद्भुत भूमी असलेला आहे. देश केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला भूमीचा तुकडा नसून जिवंत संस्कृती आणि जिवंत भूमीचे प्रतीक आहे. आपल्या या संस्कृतीचे सार हे आध्यात्म आहे आणि भारताला समजून घेण्यासाठी आधी आध्यात्म स्वीकारले पाहिजे. जगाकडे केवळ भौतिक दृष्टीकोनातून पाहणारे भारताला विविध भाषा आणि प्रांतांचा संग्रह म्हणून पाहतात. जेव्हा कोणी त्यांचा आत्मा या सांस्कृतिक जाणिवेशी जोडतो तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने भारत दिसतो. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी गीतेद्वारे भगवान कृष्णाचे गहन ज्ञान उपलब्ध करून दिले.

त्याचप्रमाणे श्रील प्रभुपादांनी इस्कॉनच्या माध्यमातून गीता लोकप्रिय केली, भाष्य प्रकाशित केले आणि लोकांना तिच्या साराशी जोडले. वेगवेगळ्या ठिकाणी आणि काळात जन्मलेल्या या संतांनी प्रत्येकाने आपापल्या अनोख्या पद्धतीने कृष्णभक्तीचा प्रवाह पुढे नेला आहे. ते पुढे म्हणाले की त्यांच्या जन्मकाळात, भाषांमध्ये आणि पद्धतींमध्ये फरक असूनही, त्यांची समज, विचार आणि जाणीव एक होती आणि या सर्वांनी भक्तीच्या प्रकाशाने समाजात नवीन चैतन्य, प्रेरणा दिली. नवी दिशा आणि ऊर्जा दिली.

भारताच्या अध्यात्मिक संस्कृतीचा पाया ही सेवा आहे, असे नमूद करून श्री.मोदी यांनी अध्यात्मात देवाची सेवा करणे आणि लोकांची सेवा करणे हे एक होते यावर भर दिला. भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही निःस्वार्थी असते असा श्रीकृष्णाच्या श्लोकाचा उल्लेख करून पंतप्रधानांनी सर्व धार्मिक ग्रंथ आणि धर्मग्रंथ सेवेच्या भावनेवर आधारित असल्याचे अधोरेखित केले. इस्कॉन ही एक विशाल संस्था शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणासाठी योगदान देत सेवेच्या या भावनेने कार्यरत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितल

कुंभमेळयात इस्कॉन महत्त्वपूर्ण सेवा उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्याच सेवेच्या भावनेने सरकार सातत्याने नागरिकांच्या कल्याणासाठी काम करीत असल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले. प्रत्येक घरात शौचालये बांधणे, उज्ज्वला योजनेतून गरीब महिलांना गॅस कनेक्शन देणे, प्रत्येक घरात नळाला पाणी देणे, प्रत्येक गरीब व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देणे, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे ही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. वयानुसार, आणि प्रत्येक बेघर व्यक्तीला पक्की घरे उपलब्ध करून देणे या सर्व कृती या सेवेच्या भावनेने चालतात. सेवेची ही भावना खरा सामाजिक न्याय मिळवून देते आणि खऱ्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला.

कृष्णा सर्किटच्या माध्यमातून सरकार देशभरातील विविध तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांना जोडत आहे. हे सर्किट गुजरात, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि ओडिशापर्यंत विस्तारलेले आहे. स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनेंतर्गत या स्थळांचा विकास करण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी कृष्णा सर्किटशी जोडलेल्या या श्रद्धा केंद्रांमध्ये भक्तांना आणण्यासाठी इस्कॉन मदत करू शकते, असे त्यांनी सुचविले. तसेच इस्कॉनला त्यांच्या केंद्रांशी संबंधित सर्व भाविकांना भारतातील अशा किमान पाच ठिकाणी भेट देण्यास प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

ज्ञान आणि भक्तीच्या या महान धर्तीवर इस्कॉन मंदिराचे उद्घाटन होत आहे. श्री राधा मदनमोहनजी मंदिर संकुलाची रचना आणि संकल्पना अध्यात्म आणि ज्ञानाच्या संपूर्ण परंपरेचे प्रतिबिंबित करते. मंदिरात दिव्यत्वाची विविध रूपे दिसून येतात, जी 'एको अहं बहु स्यम' ही कल्पना व्यक्त करते. नवीन पिढीच्या आवडी आणि आकर्षणांना पूर्ण करण्यासाठी येथे रामायण आणि महाभारतावर आधारित संग्रहालय बांधले जात आहे. त्याचप्रमाणे वृंदावनच्या १२ वनांपासून प्रेरित एक बाग विकसित केली जात आहे. हे मंदिर भारताच्या चेतनेला श्रद्धेसह समृद्ध करणारे एक पवित्र केंद्र बनेल असा विश्वास व्यक्त केला. समाज जसजसा अधिक आधुनिक होत जातो तसतसा त्याला अधिक करुणा आणि संवेदनशीलतेची आवश्यकता असते. मानवी गुण आणि आपलेपणाची भावना असलेल्या संवेदनशील व्यक्तींचा समाज निर्माण करण्याची गरज आहे. इस्कॉन, त्यांच्या भक्ती वेदांताद्वारे जागतिक संवेदनशीलतेत नवीन जीवन फुंकू शकते आणि जगभरात मानवी मूल्यांचा विस्तार करू शकते, असे सांगून शेवटी पंतप्रधानांनी विश्वास व्यक्त केला की, इस्कॉनचे सदस्य श्रील प्रभुपाद स्वामींच्या आदर्शांचे पालन करीत राहतील.

पंतप्रधान श्री.मोदी पुढे म्हणाले, गेल्या दशकात देशाने विकास आणि वारसा यामध्ये एकाच वेळी प्रगती पाहिली आहे. इस्कॉनसारख्या संस्थांचे वारशाच्या माध्यमातून विकासाच्या या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. मंदिरे आणि धार्मिक स्थळे शतकानुशतके सामाजिक जाणीवेचे केंद्र आहेत आणि गुरुकुलांनी शिक्षण आणि कौशल्य विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इस्कॉन आपल्या कार्यक्रमांद्वारे तरुणांना अध्यात्माला त्यांच्या जीवनाचा भाग बनवण्यास प्रेरित करते. इस्कॉनचे तरुण अभ्यासक त्यांच्या परंपरांचे पालन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतात, त्यांचे माहिती नेटवर्क हे इतरांसाठी एक आदर्श आहे. इस्कॉनच्या मार्गदर्शनाखाली, तरुण सेवा आणि समर्पणाच्या भावनेने राष्ट्रीय हितासाठी काम करतील, असा विश्वास आहे. मंदिर संकुलात स्थापन झालेल्या भक्तीवेदांत आयुर्वेदिक उपचार केंद्र आणि भक्तिवेदांत वैदिक शिक्षण महा विद्यालयाचा समाज आणि संपूर्ण देशाला फायदा होईल, असे सांगून पंतप्रधान श्री.मोदी यांनी 'हील इन इंडिया' असे आवाहनही केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इस्कॉन मंदिराचे मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू यांनी केले. या कार्यक्रमास इस्कॉन मंदिराचे सदस्य, प्रसिद्ध आध्यात्मिक नेते आणि संत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नौदलाच्या शक्तीत वाढ

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

भारतीय नौदलाच्या इतिहासात १५ जानेवारी २०२५ हा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. निलगिरी, सूरत या विनाशिका अन् वाघशीर ही पाणबुडी अशा तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा ताफा भारतीय नौदलात सामील झालाय. पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झालाय. यावेळी राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि नौदल प्रमुखांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



भारताचे स्थान जागतिक पातळीवर उंचावले : एकाच दिवशी नौदलाच्या ताफ्यात दोन विनाशिका आणि एक पाणबुडी सामील होण्याची ही पहिलीच वेळ आहे. विशेष बाब म्हणजे मुंबईतील माझगाव डॉक शिप बिल्डर्स लिमिटेड येथे या तिन्ही लढाऊ युद्धनौकांचं आरेखन आणि बांधणी करण्यात आलीय. या युद्धनौका निर्मितीच्या माध्यमातून संरक्षण उत्पादनासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचा भारताने पुन्हा एकदा प्रत्यय दिलाय. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या या युद्धनौका आणि पाणबुड्या यशस्वीरीत्या बनवून कार्यान्वित करण्यात आल्याने युद्धनौका आरेखन आणि बांधणी क्षेत्रात भारताने केलेल्या जलद प्रगतीवर प्रकाश पडलाय. यामुळे संरक्षण उत्पादनात भारताचे स्थान जागतिक पातळीवर उंचावून अधिक मजबूत झालंय.

नौदलाच्या ताफ्यातील युद्धनौकांमुळे अधिक सज्जता- मोदी : आत्मनिर्भर भारतासाठी आणि भारतीय नौदलासाठी आजचा दिवस महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची स्थापना केली आणि त्याला बळकट केलंय. २१ व्या शतकातील नौदलाला सशक्त करण्यासाठी आम्ही महत्त्वपूर्ण पाऊल उचललंय. भारतीय बनावटीच्या युद्धनौका नौदलात सामील होत आहेत, याच्या निर्मितीत असलेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. भारताचा समृद्ध इतिहास राहिला आहे, भारत आता एक प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयास येत आहे. आज ताफ्यात आलेल्या युद्धनौकांमध्ये या सामर्थ्याची झलक आहे. शिवाजी महाराजांच्या भूमीवरून नौदलाला अधिक सामर्थ्यवान केलं गेलंय. काही वर्षांपूर्वी कलवरी श्रेणीच्या पाणबुडीला नौदलात सामील करताना सहभागी होण्याची संधी मिळाली होती. या श्रेणीच्या सहाव्या पाणबुडीला ताफ्यात समाविष्ट करण्याची संधी मिळालीय. भारताची सुरक्षा आणि प्रगतीला नवीन सामर्थ्य मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाय. भारत आता एक मजबूत साथी म्हणून ओळखला जातोय. भारत विस्तारवाद नव्हे तर विकासवाद म्हणून काम करीत आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधानांनी यावेळी काढलंय. देशाच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक सैनिकाचं त्यांनी कौतुक केलंय.



# एकाच ट्रॅकवर दोन लोकल समोरासमोर

## थोडक्यात टळली मोठी दुर्घटना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

मुंबईची लाईफलाईन असलेल्या लोकल ट्रेनचा मोठा अपघात टळला आहे. मिरा रोड रेल्वे स्थानकावर एकाच ट्रॅकवर दोन लोकल समोरासमोर आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पण सुदैवाने मोटरमनने वेळीच प्रसंगावधान राखत काही अंतरावरच लोकल थांबवली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, ऐन संध्याकाळी मिरा रोड रेल्वे स्थानकावर ही घटना घडली आहे. संध्याकाळी चाकरमानी आपल्या घराकडे जाण्याची ही वेळ असते. त्यामुळे चर्चगेटहून वसई-विरारकडे जाणाऱ्या लोकलला मोठी गर्दी असते. मिरा रोड रेल्वे स्थानकावर संध्याकाळी प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर अचानक एकाच ट्रॅकवर दोन लोकल आल्याचं दिसलं. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. अचानक एकाच ट्रॅकवर दोन लोकल आल्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. ही लोकल दादरकडून वसईच्या दिशेनं जात होती. त्याचवेळी आणखी एक लोकल याच रेल्वे ट्रॅकवर आली. त्यामुळे मिरारोड आणि भाईंदर रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. अखेरीस दोन तासांच्या प्रयत्नानंतर रेल्वे सेवा सुरळीत झाली आहे. सिग्नल बिघाड झाल्याने ही घटना घडली असल्याचं सांगण्यात आलं आहे. दुपारी ५.३० वाजताची घटना घडली होती. १० मिनटे दोन्ही लोकल ट्रेन समोरासमोर उभ्या होत्या. त्यामुळे प्रवाशी घाबरून रेल्वे ट्रॅकवर उतरले आणि पायी चालत रेल्वे स्थानकाच्या बाहेर पडले. सुदैवाने ही दुर्घटना टळली आहे. मिरा रोड रेल्वे स्थानकारवरची रेल्वे वाहतूक सेवा सुरळीत झाली आहे.

# काँग्रेसची 'संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा'




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

भाजपाकडून संविधान व संविधान निर्मात्याचा सातत्याने अवमान केला जात असल्याचा आरोप करत काँग्रेसने घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटना यांचा सन्मान, सामाजिक न्याय व समानतेच्या मुल्यांचे रक्षणासाठी 'जय बापू, जय भीम, जय संविधान' हे देशव्यापी अभियान सुरू केले आहे. या अभियानाचा पुढचा टप्पा म्हणून आता २६ जानेवारी २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या वर्षभराच्या कालावधीत 'संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा' ही देशव्यापी मोहीम काँग्रेसकडून राबवण्यात येणार आहे. 'भारत जोडो' यात्रेप्रमाणे या यात्रेला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. या वक्तव्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान झाल्याचे सांगत काँग्रेसने अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. या मुद्यावरून अमित शहा आणि भाजपाचा निषेध म्हणून देशव्यापी संविधान सन्मान मोहीम राबवण्याचाही निर्णय घेतला होता. त्यानुसार गेल्या वर्षी २६ डिसेंबर रोजी बेळगाव येथे झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीनंतर 'जय बापू, जय भीम, जय संविधान' हे अभियान राबवण्यात येणार होते. परंतु माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने हे अभियान स्थगित झाले होते. ते ३ जानेवारीपासून सुरू करण्यात आले असून, २६ जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगाव असलेल्या महू येथे त्याची सांगता होणार आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांचा सन्मान, सामाजिक न्याय व समानतेच्या मुल्यांचे रक्षणासाठी करण्यासाठी काँग्रेस पक्ष कटीबद्ध आहे. याच हेतूने काँग्रेस पक्षाने 'जय बापू, जय भीम, जय संविधान' हे अभियान आयोजित केले आहे. देशपातळीवर ३ जानेवारीपासून हे अभियान सुरू झाले असून २६ जानेवारी रोजी महूच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे सांगता होणार आहे. या निमित्ताने महूमध्ये भव्य रॅलीने होणार आहे.

# शेकाप फुटीच्या उंबरठयावर

## जयंत पाटलांच्या एकाधिकारशाहीला कंटाळून पुतण्या अनब भाचा भाजपच्या वाटेवर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/रायगड(प्रतिनिधी)

राज्यात एकच आमदार असलेल्या शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) फुटीच्या उंबरठ्यावर आहे. 'शेकाप'चे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या एकाधिकारशाहीला कंटाळून पुतण्या आणि भाचा भाजपच्या मार्गावर आहेत. 'शेकाप'च्या माजी जिल्हा चिटणीस आणि मीनाक्षी पाटील यांचे चिरंजीव आस्वाद पाटील, माजी आमदार सुभाष पाटील यांचे चिरंजीव सवाई पाटील यांच्यासह अनेक मोठे नेते येत्या काही दिवसांत भाजपमध्ये दाखल होऊ शकतात. मोजके काही जिल्हे आणि तालुक्यांपुरते राहिलेल्या 'शेकाप'समोर अडचणी कमी होताना दिसत नाहीत. ऑगस्ट २०२४ मध्ये पंढरपूर येथील 'शेकाप'च्या अधिवेशनात जयंत पाटील आणि त्यांचे बंधू माजी आमदार सुभाष उर्फ पंडीत पाटील यांनी पक्षातील मनमानी कारभाराबद्दल पहिल्यांदा नाराजी व्यक्त केली.

# वाहनांची एकमेकांना धडक

## बसमधील तिघांचा मृत्यू




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

ठाणे जिल्ह्यात मुंबई-आग्रा महामार्गावर बुधवारी सकाळी एका ऑटोरिक्षाने बस आणि इतर काही वाहनांना धडक दिली. यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले जेएनएन, आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.शहापूर तालुक्यातील घोटेघर गावातील खिनावली पुलाजवळ मुंबई-आग्रा महामार्गावर पहाटे हा अपघात घडला, असे त्यांनी सांगितले. ऑटोरिक्षा चालकाचे चाकांवरील नियंत्रण सुटले. परिणामी, वाहन रस्त्याच्या दुभाजकाला धडकले, लेन उडी मारली आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या खाजगी लक्झरी बस, दोन कार आणि एका टेम्पोला धडकले, अशी माहिती ठाणे पोलिसांनी सांगितले.

बसमधील तीन जण जागीच ठार झाले आणि ऑटोरिक्षा चालकासह १५ जण जखमी झाले, असे त्यांनी सांगितले. बस नाशिकहून मुंबईला जात होती, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.सूचना मिळताच स्थानिक पोलिसांनी आपत्कालीन पथकांसह घटनास्थळी धाव घेतली. जखमींना शहापूर उपरुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत,

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

## गीतासार



न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा । १-३२ ।

**अर्थ**

हे कृष्णा, मला तर विजयाची इच्छा नाही, राज्याची नाही की सुखांचीही नाही. हे गोविंदा, आम्हाला असे राज्य काय करायचे? अशा भोगांनी आणि जगण्याने तरी काय लाभ होणार आहे? । १-३२ ।

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च
। १-३३ ।

**अर्थ**

आम्हाला ज्यांच्यासाठी राज्य, भोग आणि सुखादी अपेक्षित आहेत, तेच हे सर्वजण संपत्तीची आणि जीविताची आशा सोडून युद्धात उभे ठाकले आहेत. ।१-३३ ।

**आरोग्य टिप्स**

## रिकाम्या पोटी चहा प्यायलात तर होईल नुकसान



**शरीराच्या पौष्टिक स्थितीवर परिणाम**

चहामध्ये असलेले टॅनिन शरीरातील पोषक तत्वांचे शोषण रोखू शकते. जर तुम्ही रिकाम्या पोटी चहा प्यायलात तर तुमच्या शरीरातील लोहासारख्या महत्त्वाच्या पोषक तत्वांची कमतरता भासू शकते. विशेषतः ज्यांना अशक्तपणा किंवा रक्ताच्या कमतरतेची समस्या आहे त्यांच्यासाठी रिकाम्या पोटी चहा पिणे आरोग्यासाठी आणखी हानिकारक ठरू शकते.

**चयापचय वर परिणाम**

रिकाम्या पोटी चहा पिल्याने शरीरातील चयापचय असंतुलित होऊ शकतो. कॅफिनचा तुमच्या चयापचय आणि उर्जेच्या पातळीवर थेट परिणाम होतो. चहा पिल्यानंतर काही लोकांना ऊर्जा मिळते, परंतु रिकाम्या पोटी चहा पिल्याने उलट परिणाम होऊ शकतो. यामुळे अशक्तपणा, थकवा आणि चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

**तोंडाच्या स्वच्छतेवर परिणाम**

सकाळी रिकाम्या पोटी चहा पिल्याने तोंडात बॅक्टेरियाची पातळी वाढू शकते. चहामधील साखर आणि आम्ल (जर तुम्ही गोड चहा प्यायलात तर) तोंडात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रोत्साहन देतात. यामुळे दात किडणे आणि हिरड्यांच्या समस्या उद्भवू शकतात.

**झोपेवर परिणाम**

चहामध्ये असलेले कॅफिन तुमच्या झोपेसाठी हानिकारक असू शकते. जर तुम्ही रिकाम्या पोटी चहा प्यायलात तर ते तुमच्या झोपेत व्यत्यय आणू शकते आणि शरीरात तणाव हार्मोन वाढवू शकते. यामुळे तुम्हाला निद्रानाश, अस्वस्थता आणि मानसिक ताण येऊ शकतो.

**पोट फुगणे आणि गॅसची समस्या होणे**

रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटफुगी आणि गॅस तयार होणे यासारख्या सामान्य समस्या उद्भवतात. विशेषतः दुधासोबत चहा पिल्याने ही समस्या आणखी वाढू शकते. यामुळे पोटात जडपणा आणि अस्वस्थता येऊ शकते.

# प्रेक्षणीय स्थळ गोकर्ण

आपले रमणीय समुद्र किनारे आणि मंदिरांसाठी ओळखले जाणारे गोकर्ण कर्नाटकच्या उत्तर कन्नड जिल्ह्यातील एक शांत शहर आहे. येथील रमणीय समुद्रकिनारा पर्यटकांना आकर्षित करितो. तसेच भव्य आणि प्राचीन मंदिरे येथील इतिहासाची साक्ष देतात. प्रत्येक वर्षी हजारो पर्यटक येथे पर्यटनासाठी येतात. गोकर्णाला कर्नाटकचे 'लपलेले रत्न' म्हणून देखील ओळखले जाते.



**गोकर्ण धार्मिक मान्यता-**

गोकर्ण एक धार्मिक तीर्थस्थळ देखील आहे. जिथे भगवान शंकरांचे स्थान आहे. भगवान शिव गायीच्या कानामधून प्रकट झालेले आहे म्हणून या स्थळाचे नाव गोकर्ण असे सांगण्यात येते.

**गोकर्णचे धार्मिक स्थळ-**

येथील मंदिरांवर दक्षिण भारताच्या चालुक्य व कदम्ब वस्तु शैलींचे मिश्रित प्रभाव पाहण्यास मिळतात. महाबळेश्वर मंदिर येथील प्रमुख मंदिर आहे. महाबळेश्वर, सेजेश्वर, गुणवन्तेश्वर, मुरुदेश्वर आणि धारेश्वर या मंदिरांना 'पंच महाक्षेत्र' नावाने देखील ओळखले जाते.

**महाबलेश्वर मन्दिर-**

सह्याद्रीवर स्थित भगवान शिव यांना समर्पित हे मंदिर कमीतकमी १,५०० वर्ष जुने आहे. हे मंदिर द्रविड वास्तुकलाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ज्याच्या निर्माणमध्ये ग्रेनाइट दगडांचा उपयोग करण्यात आला आहे. याला कर्नाटकमधील सात मुक्तिस्थळांपैकी एक मानले जाते. इथे सहा फूट शिवलिंग आहे, ज्याला आत्मालिंग रूपात ओळखले जाते. पौराणिक आख्यायिकांमध्ये या शिवलिंगचा उल्लेख आढळतो. तसेच महागणपति मंदिर, भद्रकाली मंदिर, महालासा मंदिर, सोमेश्वर मंदिर, उमा महेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर हे प्राचीन वारसा लाभलेले मंदिर देखील आपल्या वास्तुकलेमुळे पर्यटकांना आकर्षित करतात.

तसेच कोटि तीर्थ नावाचे एक पवित्र जलकुंड इथे आहे. व्रत-उपवास आणि धार्मिक आयोजन दरम्यान मोठ्या संख्येने लोक इथे येतात. श्रद्धाळू येथील पवित्र जलात डुबकी लावतात. हे कोटि तीर्थ गोकर्ण पासून अडीच किमी दूर आहे.

**नैसर्गिक पर्यटन स्थळे-**

ओम बीच, कुडले बीच, हाफ मून बीच, पैराडाइज बीच हे गोकर्णमधील प्रसिद्ध आणि विशाल रमणीय समुद्रकिनारे आहे. तसेच याना गुफा, लाल्गुली जलप्रपात हे देखील रमणीय पर्यटनस्थळे आहे.

**गोकर्णाचा ऐतिहासिक वारसा-**

सोळाव्या शतकात बनवला गेलेला मिरजन किल्ला गोकर्ण शहरापासून ११ किमी दूर राष्ट्रीय राजमार्ग ६६ वर स्थित आहे. हा किल्ला अघनाशिनी नदीच्या काठावर सुमारे चार हेक्टरमध्ये पसरलेले आहे. तसेच हा किल्ला १६व्या आणि १७व्या शतकातील अनेक युद्धांचा साक्षीदार आहे.

**गोकर्णाला भेट देण्याची उत्तम वेळ-**

गोकर्णासह जवळजवळ संपूर्ण कर्नाटकला भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे ऑक्टोबर ते माच.

**गोकर्ण कर्नाटक जावे कसे?**

विमानसेवा- सर्वात जवळचे विमानतळ गोव्याचे दाबोलिम आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. १४९ किमी अंतरावर गोकर्ण आहे. तुम्ही विमानतळावरून कॅब किंवा टॅक्सी करून या शहरात पोहचू शकतात.

रेल्वे मार्ग- गोकर्ण रेल्वे स्टेशनवर मोजक्याच गाड्या थांबतात. सर्वात जवळचे प्रमुख रेल्वे स्टेशन, अंकोला, असून २२ किमी अंतरावर गोकर्ण आहे. नवी दिल्ली, बंगळुरू, मुंबई, पुणे, नागपूर, जयपूर इत्यादी ठिकाणांहून अंकोलासाठी रेल्वे उपलब्ध आहेत. कारवार रेल्वे स्टेशन गोकर्णापासून ६५ किमी अंतरावर आहे.

रस्ता मार्ग- कारवारहून गोकर्णाला जाण्यासाठी ६१ किमी प्रवास करावा लागतो. तसेच हे अंकोल्यापासून सुमारे २६ किमी आणि पणजी गोव्यापासून सुमारे १५४ किमी अंतरावर आहे. बेंगळुरू, मंगळुरू, म्हैसूर, कोईम्बतूर आणि रत्नागिरी येथून रस्ता मार्गाने सहज गोकर्णला पोहोचता येते.

## आजचे राशीभविष्य

**मेष**

आज तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत चांगला वेळ घालवाल. घरगुती कामात रुची राहील आणि मनोरंजनाशी संबंधित योजनाही बनवता येतील.

**वृषभ**

एक पद्धतशीर दैनंदिन दिनचर्या आणि खाण्याच्या सवयी तुमचे आरोग्य चांगले ठेवतील. आणि तुम्हाला निरोगी आणि उत्साही वाटेल.

**मिथुन**

प्रत्येक काम स्वबळावर करण्याची क्षमता तुमच्यात असेल.तुमचा जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल आणि तुमच्या कामात तुम्हाला मदत करेल.

**कर्क**

आज तुमच्या स्वभावात गोंधळ आणि राग दिसू शकतो ज्यामुळे कुटुंबातील सदस्यही त्रासलेले राहतील. व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह**

संधीचा पुरेपूर उपयोग करून घ्या. व्यापारी पक्षांशी सौहार्दपूर्ण संबंध विकसित करण्याचा प्रयत्न कराल. आज कौटुंबिक बाबींमध्ये जास्त हस्तक्षेप करू नका.

**कन्या**

अनेक प्रकारच्या विचारांची देवाणघेवाण होईल. आज बऱ्याच दिवसांनी जवळचे नातेवाईक घरी येतील आणि घरातील वातावरण आनंदी राहील.

**तूळ**

वरिष्ठ सदस्याच्या सल्ल्याकडे आणि मार्गदर्शनाकडे लक्ष देणे योग्य ठरेल. तुम्ही तणावात न पडता तुमच्या वैयक्तिक कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.

**वृश्चिक**

मुलांचे शिक्षण आणि करिअरशी संबंधित काही कामही होऊ शकते. संयम आणि शांत राहा आणि रागाच्या ऐवजी शांततेने उपाय शोधा.

**धनु**

निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका आणि तुमच्या कामात व्यस्त राहा कोणाचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्या.

**मकर**

तुमच्या महत्त्वाच्या गोष्टींची काळजी तुम्ही स्वतः घ्याल.धार्मिक कार्यात तुमची रुची वाढेल. तुम्हाला अधिकृत ट्रिप देखील करावी लागू शकते.

**कुंभ**

पदोन्नतीचीही शक्यता आहे. वैवाहिक जीवनात एकमेकांबद्दल आदरयुक्त भावना निर्माण होईल. खाण्यापिण्याच्या सवयींकडे विशेष लक्ष द्या.

**मीन**

अनुभवी व्यक्तीचा सल्ला आणि मदत तुमच्या व्यवसायाला नवी दिशा देईल. परदेशात जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना काही चांगली बातमी मिळू शकते.

# स्कीन फास्टिंग



प्रत्येकीला आपली त्वचा सुंदर आणि चमकदार असावी असं वाटत असतं. त्वचेची निगा राखण्यासाठी आजकाल अनेक गोष्टी केल्या जातात. महागड्या ब्युटी ट्रिटमेंट, काटेकोर डाएट, भरमसाठी ब्युटी प्रॉडक्ट वापरूनही बऱ्याचदा हवा तसा परिणाम दिसून येत नाही. वास्तविक त्वचेची नैसर्गिक पद्धतीने निगा राखणं जास्त फायदेशीर ठरू शकतं. नैसर्गिक पद्धतीने त्वचेची निगा राखण्यासाठी आजकाल स्कीन फास्टिंग एवढ ईंग्हु केलं जातं. त्यामुळे स्कीन फास्टिंग करणं सध्यास ट्रेंडमध्ये आहे. जाणून घ्या पद्धत आणि फायदे

**काय आहे स्कीन फास्टिंग**

ट्रेंडमध्ये असलेलं हे स्कीन फास्टिंग म्हणजे नेमकं काय आहे आणि ते कसं करावं असं तुमच्या मनात नक्कीच सुरू असेल. स्कीन फास्टिंग म्हणजे त्वचेला केमिकलयुक्त प्रॉडक्टपासून दूर ठेवायचं. कारण आजकाल बाजारात मिळणाऱ्या ब्युटी प्रॉडक्ट्समध्ये भरपूर केमिकल्स असतात. ज्यामुळे त्वचचं नुकसान होऊ शकतं. अचानक स्कीन केअर अथवा मेकअपचे प्रॉडक्ट वापरणं थांबवता येत नसलं तरी, हळू हळू तुम्हाला तुमच्या त्वचेवर असा ब्युटी प्रॉडक्टचा मारा करणं थांबवता येतं. यालाच स्कीन फास्टिंग असं म्हणतात. स्कीन फास्टिंग जमू लागल्यावर तुम्ही नैसर्गिक पद्धतीने अथवा घरगुती उपचार करून तुमच्या त्वचेची निगा राखायची असते. कारण नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले स्कीन केअर अथवा घरगुती उपचार तुमच्या त्वचेची निगा तर राखताच पण त्यामुळे तुमच्या त्वचेच्या समस्यांही कमी होतात.

**स्कीन फास्टिंग कसं करावं**

आपल्याला नेहमी अनेक ब्युटी प्रॉडक्ट वापरण्याची सवय झालेली असते. त्यामुळे ब्युटी प्रॉडक्टशिवाय जगणंही आपण सहन करू शकत नाही. पण जर ते ब्युटी प्रॉडक्ट तुमच्या त्वचेवर दुष्परिणाम करत असतील तर त्यापासून दूर राहणं हाच उत्तम उपाय आहे. यासाठी अचानक ब्युटी प्रॉडक्ट वापरणं सोडू नका. नाहीतर तुमची त्वचा लगेच निस्तेज आणि कोरडी पडेल. हळू हळू ब्युटी प्रॉडक्ट्स वापरणं सोडायचा प्रयत्न करा. या दरम्यान तुम्ही वेगन, केमिकल फ्री, आयुर्वेदिक, क्रुअल्टी फ्री प्रॉडक्ट्स नक्कीच वापरू शकता. त्यानंतर त्वचेची निगा राखण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि नैसर्गिक उपाय करणे सुरू करा.

# आत्मविश्वास वाढवण्यासाठी रोज करा ही योगासने



आजच्या काळात आत्मविश्वास असणं खूप गरजेचं आहे. तुम्हाला तुमच्या व्यावसायिक जीवनात प्रगती करायची असेल, तुमचे नाते मजबूत करायचे असेल किंवा आयुष्याला सामोरे जाण्याची तयारी हवी असेल, आत्मविश्वास ही तुमची सर्वात मोठी ताकद आहे. पण अनेक वेळा, स्वतःवरील विश्वासाचा अभाव आपल्याला मागे ठेवतो. चिंता, भीती आणि नकारात्मक विचार यामुळे आपला आत्मविश्वास कमी होतो. पण काळजी करू नका, योगासने तुमचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करू शकतात! येथे काही सोपी योगासने आहेत जी तुम्ही दररोज करू शकता.

**१. सूर्यनमस्कारः**

सूर्यनमस्कार हे एक उत्तम योगासन आहे जे तुमच्या संपूर्ण शरीराला ऊर्जा देते. हे तुमचे शरीर लवचिक बनवते, रक्त परिसंचरण सुधारते आणि तुमचे मन शांत करते. सूर्यनमस्कार नियमित केल्याने तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्हाला अधिक उत्साही वाटेल.

**२. ताडासन (पाम ट्री पोझ):**

हे आसन तुमचे संतुलन आणि स्थिरता सुधारते. ताडासन केल्याने तुमचे शरीर मजबूत होते आणि तुमचे मन शांत होते. हे आसन तुमचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करते कारण ते तुम्हाला स्वतःवर नियंत्रण ठेवण्यास शिकवते.

**३. वृक्षासन (वृक्ष मुद्रा):**

वृक्षासन हे आणखी एक संतुलित आसन आहे जे तुम्हाला स्थिरता आणि एकाग्रता शिकवते. हे आसन तुमचे पाय मजबूत करते आणि तुमचे संतुलन सुधारते. वृक्षासन केल्याने तुमचा आत्मविश्वास वाढेल कारण ते तुम्हाला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवते.

**४. उत्कटासन (चेअर पोज):**

हे आसन तुमचे पाय आणि मांड्या मजबूत करते आणि तुमचे शरीर लवचिक बनवते. उत्कटासन केल्याने तुमचे शरीर अधिक ऊर्जावान बनते आणि तुमचे मन शांत होते. हे आसन तुमचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करते कारण ते तुम्हाला स्वतःला आव्हान देण्यास प्रवृत्त करते.

**५. भुजंगासन (कोब्रा पोझ):**

हे आसन तुमचा मणका मजबूत करते आणि तुमचे शरीर लवचिक बनवते. भुजंगासन केल्याने तुमचे शरीर अधिक ऊर्जावान बनते आणि तुमचे मन शांत होते. हे आसन तुमचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करते कारण ते तुम्हाला अधिक शक्तिशाली वाटते.

**लक्षात ठेवाः**

ही योगासने करण्यापूर्वी योग तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. तुमच्या शरीराचे ऐका आणि तुमच्यासाठी योग्य असलेला वेग निवडा. हळूहळू सुरुवात करा आणि कालांतराने तुमची क्षमता वाढवा. नियमितपणे योगा करा आणि तुमचा आत्मविश्वास वाढवा! योगासनांमुळे तुमचे शरीर आणि मन दोघांनाही फायदा होतो. ही आसने तुम्हाला शारीरिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासोबतच तुमचे मन शांत आणि स्थिर ठेवण्यासही मदत करतात. नियमित योगासने केल्याने तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्ही आयुष्याला सामोरे जाण्यास तयार व्हाल.

**तेथे कर माझे जुळती**

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे स्मृतिदिन



( १८ जानेवारी १८४२- १६ जानेवारी १९०१ )

आधुनिक भारताचे द्रष्टे , अर्थशास्त्रज्ञ, महाराष्ट्रातील पारतंत्र्याच्या काळातील समाज सुधारक व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या महादेव गोविंद रानडे यांचा जन्म नाशिक मधील निफाड या गावी दिनांक १८ जानेवारी १८४२ रोजी झाला .त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे झाले .पुढील शिक्षणासाठी ते मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल झाले . प्रगल्भ बुद्धीच्या (स्कॉलर )महादेवांना शिष्यवृत्ती ही मिळत होती . १८६२ मध्ये ते प्रथम श्रेणीत बी .ए .आणि ।८६४ मध्ये एम . ए . उत्तीर्ण झाले . नंतर ते एल .एल. बी . झाले . सन १८७१ पासून पुणे येथे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाली. नंतर ।८९३ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले . याच काळात लोकहितवादी , विष्णुशास्त्री चिपळूणकर , महात्मा ज्योतिराव फुले या समाजसुधारकांच्या आंदोलनातही रानडे सहभागी झाले होते .राजा राममोहन रॉय यांनी हिंदू धर्मामध्ये मौलिक तात्विक परिवर्तनाला सुरुवात केली . त्यात न्यायमूर्ती रानडे यांनी स्वतःच्या धर्म चिंतनाची भर घातली .न्यायमूर्ती रानडे यांनी इंडियन नॅशनल काँग्रेस आणि सामाजिक परिषद या दोन महत्त्वाच्या संस्था स्थापन केल्या .समाज जीवनाचा साकल्याने विचार करायचा असा त्यांचा दृष्टिकोन होता . वंशभेद व धर्मभेद न करता मनुष्या मनुष्यात समानता व न्याय प्रस्थापित करणे हे नव युगातील माणसांचं कर्तव्य असल्याचं ते मानत . राजा राम मोहन रॉय यांनी बंगालमध्ये स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजाच्या धरतीवर महाराष्ट्रात रानडे यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली . संत एकनाथांच्या भागवत धर्माचा त्यांच्या मनावर पगडा होता .सार्वजनिक सभेच्या कार्याला त्यांनी राजकीय चळवळी स्वरूप दिले व काँग्रेसला सतत मार्गदर्शन केले. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून १८७४ ते १८७६ या काळात महाराष्ट्रात दुष्काळ पडला असताना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची त्यांनी पाहणी केली . त्या पाहणीत सरकारी धोरणावर त्यांनी कोरडे ओढले .सन १८८५ मध्ये रानडे यांना ब्रिटिश सरकारने फायनान्स कमिटी वर घेतले . कंगाल हिंदुस्थानला स्वतःच अर्थशास्त्र पाहिजे ,असे प्रतिपादन त्यांनी सतत केले . मराठी साहित्य संमेलनाच्या जन्मदात्या पहिल्या अशा मराठी ग्रंथकार संमेलनाचे ही न्यायमूर्ती रानडे अध्यक्ष होते . दीर्घ आजारामुळे मुंबईत १६ जानेवारी १९०१ रोजी त्यांचे निधन झाले . 'भारतीय अर्थशास्त्राचे जनक ' व अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी झटणारे तसेच विधवा विवाहाला मान्यता देणारे , स्त्री व पुरुषांना समान शिक्षण देण्याबाबत आग्रहीअसणारे समाज धुरीण , उदारमतवादाचा पुरस्कार करणारे , 'राईज ऑफ द मराठा पॉवर 'या ग्रंथाचे लेखक हरपल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक , औद्योगिक व धार्मिक व आर्थिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली.



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# महापालिकेच्या सेवा लोकाभिमुख करा

## महापालिका आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड़



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण(प्रतिनिधी)

महापालिकेच्या सेवा जास्तीत जास्त लोकाभिमुख होतील ह्याची दक्षता घ्यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आज दिले. जनतेला, नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाच्या सर्व क्षेत्रिय कार्याल यांसाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा तयार करुन, त्यावर प्रभावी कार्यवाही करणेबाबत निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी सर्व संबंधित अधिका-यांना दिले आहेत, त्याअनुषंगाने कार्यवाही करणेकामी आयुक्त दालनात आयोजिलेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत बोलताना आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे निर्देश दिले.

आपापल्या कार्यालयातील अभिलेखांचे वर्गीकरण करुन आवश्यकता नसल्यास सदर अभिलेख तपासणीअंती योग्य प्रक्रियेनुसार नष्ट करावेत. आवश्यक अभिलेखांचे व्यवस्थित जतन करण्यासाठी, अभिलेख कक्ष सुव्यवस्थित ठेवावा. अनावश्यक असलेले साहित्य, भंगार इ. योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करावी. आपले कार्यालय स्वच्छ व सुंदर राहील, याची दक्षता घ्यावी. आपले कार्यालय Citizen Friendly ठेवावे, अशा सूचना आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी उपस्थित अधिका-यांना दिल्या. त्याचप्रमाणे कामांचा लवकर निपटारा होण्याच्या दृष्टीकोनातून प्रभाग कार्यालयात उपअभियंता स्तरावर काही प्रमाणात आर्थिक अधिकार देण्यात यावेत. तसेच नागरिकांना त्यांच्या अडचणी, समस्यांबाबत अधिका-यांच्या भेटीसाठी वेळ ठरवून देण्यात यावा, अशाही सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या आणि याबाबत झालेल्या अंमलबजावणीची माहिती घेण्यासाठी पुन्हा काही दिवसांच्या कालावधीत बैठक घेण्यात येणार असल्याबाबत, त्यांनी यावेळी सूचित केले.

# उल्हासनगर महानगरपालिकेची आरोग्य अभियान बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
उल्हासनगर(प्रतिनिधी)



महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय नागरिक आरोग्य अभियानाची अंमलबजावणी सुरू असून विविध आरोग्यविषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत, त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदर कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरिता दिनांक १३/०१/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता माननीय आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई कार्यालया तून मा. संचालक, आरोग्य सेवा (शहरी) आयुक्तालय, मुंबई, मा. सहाय्यक संचालक, (एन. यु.एच.एम.) रा.आ.अ. मुंबई, मा. सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (एचएसएस), आयुक्तालय, मुंबई मा. सहायक संचालक, (सिकलसेल), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, राज्य वित्तीय व्यवस्थापक, कार्यक्रम अधिकारी, (जास), कार्यक्रम अधिकारी, (पदभरती), सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई क्षेत्रातील अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात भेटी देण्याकरिता आलेले होते. सकाळी १०.०० वाजता स्थायी समिती सभागृह, उल्हासनगर महानगर पालिका येथे मा. आयुक्त (प्रभारी), यांच्या उपस्थितीत वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी यांच्यासोबत सदर बैठकीचा आढावा घेण्यात सदर बैठकीची सुरुवात शहर कार्यक्रम व्यवस्थापक, यांनी पीपीटी द्वारे उपस्थितांना दिली. त्यानंतर सदर अधिकारी यांनी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र, हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे भेटी दिल्या. भेटी दरम्यान असे निदर्शनास आले की उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जास्त प्रमाणात झोपडपट्टी कार्यक्षेत्र असल्याने आरोग्य कार्यक्रमाची जास्तीत जास्त प्रमाणात जनजागृती करणे गरजेचे आहे जेणेकरून गरीब नागरिकांना मोफत औषध उपचार व संदर्भ सेवा देता येतील. तसेच शहरी सामुदायिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे निर्देश माननीय संचालक यांनी दिले. त्यानंतर माननीय आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका यांनी प्रलंबित कामांना गती देण्याचे अधिकार्यांना निर्देशित केले आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सार्वजनिक आरोग्य परिचारिका यांनी सर्व मान्यवरांचे आभार प्रदर्शन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारा

## समाजवादी पार्टीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण(प्रतिनिधी)

नवी मुंबई शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी समाजवादी पार्टीचे पनवेल नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष तथा कल्याण जिल्हा पर्यवेक्षक आर. एन. यादव यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या देशाचे संविधान निमति आहेत, त्यांची महती आपल्या सर्वांना चांगल्या प्रकारे ठाऊक आहे. त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आज आपल्या देशाने गत ७५ वर्षात उत्तुंग वाटचाल केली आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांची संपूर्ण जगामध्ये ख्याती आहे. अनेक देशांनी देखील त्यांचा यथोचित असा सन्मान केला आहे. अशा या महामानवाचा नवी मुंबई शहरात एकही पुतळा नसणे ही आपल्या सर्वांसाठीच लाजिरवाणी बाब आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवी मुंबई शहरात महत्त्वाच्या ठिकाणी पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी आंबेडकरी अनुयायांकडून गेल्या ३५ वर्षापासून करण्यात येत आहे. त्यासाठी विविध पक्ष संघटनांकडून मोर्चे आंदोलने, उपोषण करण्यात आले आहे. आंबेडकरी जनतेच्या मागणीनुसार नवी मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५ डिसेंबर २०२१ रोजी ऐरोलीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक लोकार्पण सोहळ्याप्रसंगी तत्कालीन आयुक्तांना निर्देश दिले होते.

त्याचप्रमाणे विद्यमान वन मंत्री गणेश नाईक यांनी देखील डॉ. आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा नवी मुंबई शहरात महत्त्वाच्या ठिकाणी उभरण्यासंदर्भात महापालिका प्रशासनाला अनेकवेळा सूचित केलेले आहे. तत्कालीन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याकरिता जागा निश्चित करण्यासाठी फेब्रुवारी २०२३ मध्ये समाज विकास उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती देखील गठित केली होती. मात्र, त्यानंतर महापालिकेकडून त्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येत आहे. यावरून डॉ. आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून चालढकल करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे नवी मुंबई महापालिकेने नवी मुंबई शहरात महत्त्वाच्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा लवकरात लवकर उभारून त्यांचा योग्य तो सन्मान राखावा, अशी समाजवादी पक्षाची मागणी आहे. अन्यथा पक्षाच्या वतीने महापालिके विरोधात आंदोलन करण्यात येईल. असा इशारा आर. एन. यादव यांनी दिला आहे.

# केडीएमसीच्या वतीने सफाई कर्मचा-यांना प्रशिक्षण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)

केंद्र शासनाच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये स्वच्छ भारत अभियान राबवले जात आहे. या भारत अभियानाचा मूलभूत घटक असणारे सफाई कर्मचारी यांचे शहर स्वच्छतेमध्ये मोलाचे योगदान आहे. या स्वच्छता अभियानातील सफाई कर्मचारी यांचे योगदान तसेच जबाबदारी लक्षात घेवून महा पालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ व अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या निर्देशानुसार तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यस्वप्न फाऊंडेशन यांच्या



सहकार्याने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत महा पालिकेच्या सर्व सफाई कर्मचा-यांकरिता ''क्षमता बांधणी प्रशिक्षण (घनकचरा व्यवस्थापन व वैयक्तिक स्वास्थ्य सुरक्षा विषयक कार्यशाळा)'' आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणाअंतर्गत सफाई कर्मचा-यांना घनकचरा विषयक माहिती, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, विशेषतः काम करताना घ्याववयाची काळजी, पीपीई कीट वापर संदर्भात प्रात्याक्षिक, कामासंबंधित होणारे आजार व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय व उपचार, वैयक्तिक स्वास्थ्य व सुरक्षा कशी राखावी या विषयक माहिती देण्यात येत आहे. तसेच या सफाई कर्मचाऱ्यांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देखील देण्यात येत आहे. या शिबीरामुळे सफाई कर्मचा-यांची क्षमता बांधणी होण्यास मदत होणार आहे.

डोंबिवली पूर्वेतील आनंद दिघे सभागृह येथे डोंबिवली विभागातील सफाई कर्मचा-यांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले असून, या प्रशिक्षणादरम्यान महापालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलूरकर, परिमंडळ -२ चे उप मुख्य स्वच्छता निरीक्षक आगस्तीन घुटे, तसेच फ व ग प्रभागक्षेत्राचे स्वच्छता अधिकारी शरद पांढरे, ह प्रभागक्षेत्र कार्यालयाचे स्वच्छता अधिकारी सुरेश सोळंके यांच्यासह प्रभागातील सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. या शिबीराचा लाभ आतापर्यंत जवळपास ८०० सफाई कर्मचा-यांनी घेतला आहे.

## स्वामी समर्थ मठाची

# मलंग गडावर वारी संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण(प्रतिनिधी)

सद्गुरू श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट, कल्याण (पश्चिम) यांच्या वत्तीने तसेच, गुरूवर्य मोडक महाराज यांनी सुरु केलेल्या शाकंभरी पौर्णिमा मलंग वारी पंरपरेनुसार सोमवारी श्री मंलग गडावर वारी, आरती व दर्शन क्रार्यक्रमाचे आयोजन परमानंद महाराज, अवधूतानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

शाकंभरी पौर्णिमा व आगमी नवरात्रचे औचित्य साधत मलंग गड पायथ्याशी भगाव्यामय वातावरणात स्वामी भक्तांनी गड चढण्यास सुरुवात केली. जय मलंग, श्री मलंग जयजयकाराने परिसर दुमदुमला. प्रथम गाडगेश्वर मंदिरात दर्शन आरती संपन्न झाली. पुढे मारुती दर्शना नंतर संतोषी माता मंदिरात दर्शन आरती संपन्न झाली. नवदुर्गा, शिवमंदिर दर्शन आरती, करुन दुसऱ्या समाधीला वस्त्र अर्पण करून मुख्या मंलग समाधीची विधीवत पुजा अवधूतानंद महाराज यांच्या हस्ते संपन्न करून आरती करून वारीची सांगता करण्यात आली. यावेळी मोडक महाराज गुरूबंधू, गुरूभगिनी शिष्य गण,स्वामी भक्त गण, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रकाश पाटीलांच्या हस्ते

# मुरबाड शिवसेना कार्यालयाचे उद्धाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी)

मुरबाड तालुक्यात ऐतिहासिक म्हसा यात्रा तसेच मकर संक्रांतीच्या दिनाचे औचित्य साधून मुरबाड तहसील परिसरात शिंदे गटाच्या शिवसेना मुरबाड तालुका कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर शिवसेना नेते प्रकाश पाटील, शिवसेना सहसचिव एकनाथ शेलार, भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख मदन बुवा नाईक, ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिड, संपर्कप्रमुख कल्याण सुनील वायले, उपजिल्हाप्रमुख संजय भानुशाली, मुरबाड तालुकाप्रमुख कांतीलाल कंटे, मुरबाड उपतालुकाप्रमुख अप्पा यशवंतराव, नगरसेविका नम्रता तेलवणे ,नगरसेवक अक्षय रोठे, मुरबाड विधानसभा संपर्क प्रमुख कल्पेश धुमाळ,यांच्यासह आघाडीतील महिला प्रमुख यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रस्ताविक भाषण करताना मुरबाड तालुका प्रमुख कांतीलाल कंटे म्हणाले की मुरबाड शहरात दोन ते अडीच वर्षाच्यासत्तेच्या काळात शिवसेनेचे कार्यालय व्हायला पाहिजे होते ते झाले नाही परंतु भविष्यात कार्यालय होईल अशी मी खंत व्यक्त करत आहे.

कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना शिवसेना नेते प्रकाश पाटील म्हणाले की तालुक्या मध्ये चांगल्या पद्धतीचे मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन नुकताच झाले आहे. तसेच कांतीला कंटे यांनी केलेली खंत नजीकच्या काळात भरून काढता येईल तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाच्या धरतीवर आपण सत्तेत सहभागी झालो आहोत तसेच लाडक्या बहिणीचे सुद्धा या राज्याला मोठ्या प्रमाणात योगदान लाभले आहे. त्यामुळे महायुती सत्तेत सहभागी झाली आहे. कोण काय करतो, कोण काय बोलतो, त्यापेक्षा महायुतीच्या तीन नेते विकासाच्या दृष्टीने चांगले काम करत आहेत आणि मला निश्चित खात्री आहे की येत्या नजीकच्या काळात भिवंडी लोकसभा मतदारसंघातून तरुण कार्यकर्ते जवळपास दीड हजार च्या वरती प्रवेश करणार आहेत त्यामुळे ठाणे जिल्ह्यात शिंदे गटाच्या शिवसेनेची ताकद मोठ्या प्रमाणे वाढणार आहे असे शुभ संकेत देत असताना त्यांनी मकर संक्रांतीच्या तसेच ऐतिहासिक म्हसा यात्रेच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

# शहापूर तालुक्यात भाजपचे सदस्यता नोंदणीसाठी अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/शहापूर(नरेंद्र पाटील)

शहापूर तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे सदस्यता नोंदणी अभियान सुरू असून याबाबत घर - घर चलो अभियान राबविण्यात येत आहे.

भारतीय जनता पार्टीची सदस्यता नोंदणी अभियान सुरू असून शहापूर तालुक्यातही सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी पक्षाचे कार्यकर्ते, बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख यासाठी प्रयत्न करीत आहेत. ऑनलाइन सदस्य नोंदणी करताना अडचण येत असल्याने यासाठी सुशिक्षित तरुणांची नेमणूक करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांना मदत करून सदस्य संख्या वाढवण्याचा प्रयत्न केले जात आहेत. तर पक्षातील काही जेष्ठ कार्यकर्ते यांनी हि पुन्हा सक्रीय सहभाग घेतला असल्याचे शहापूर विधानसभा निवडणूक प्रमुख अशोक इरनक यांनी म्हटले.

दरम्यान, या सुरू केलेल्या नोंदणीवेळी जिल्हाध्यक्ष जितेंद्रजी डाकी, प्रदेश कार्यकारणी सदस्य भरत पाटील साहेब, प्रदेश कार्यकारणी निमंत्रित सदस्य रामनाथ पाटील यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला तर महाराष्ट्र प्रदेशाने पन्नास हजार सदस्य नोंदणी करण्याचे उद्दिष्ट शहापूर तालुक्याला दिले असून कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नाने हे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल असा विश्वास अशोक इरनक यांनी व्यक्त केला आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

पाणी पुरवठा विभाग

ई- निविदा सुचना क्रमांक- ४३ सन २०२४-२५ (दुस-यांदा प्रसिध्द)

खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्वीकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र. ३ मध्ये ताड़ाली येथील अस्तित्वात असलेल्या जलकुंभ भरणेकामी असलेल्या पंपाकरीता निर्वात पंप (vacuum pump) बसविणेबाबत. | रु. २,८४,६४२/- | रु. २३६०/- | दि. १६/०१/२०२५ ते दि. २३/०१/२०२५ |
| २ | प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यक्षेत्रातील इदगाह स्लाटर हाऊस येथे भिवंडी शहर क्षेत्रातील भटकी कुत्री पकडून निर्बिजीकरण करून रेबिज प्रतिबंधक लस देण्याच्या ठिकाणी पाणी पुरवठ्याची सोय करणेकामी ५० मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकणेबाबत. | रु. ४,९७,५९५/- | रु. २३६०/- | |

सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर mahatenders.gov.in वर दिनांक १६/०१/२०२५ पासून उपलब्ध आहे.

सही /-
कार्यकारी अभियंता (प्र.)
पाणी पुरवठा विभाग
भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.

जा.क्र. जसंवि/४४
दिनांक- १५/०१/२०२५

# ठाणे जिल्हा परिषद गुणदर्शन स्पर्धेमध्ये 'बिऱ्हाड' बालनाटय सर्वोत्कृष्ट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण(प्रतिनिधी)



ठाणे जिल्हा परिषद आयोजित विविध गुणदर्शन स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद शाळा राहनाळ येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'बिऱ्हाड' हे बालनट्य सर्वोत्कृष्ट ठरले असून, त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. ठाणे जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी (प्राथ.) बाळासाहेब राक्षे, विस्तार अधिकारी संजय थोरात, आशिष झुंजारराव व परीक्षक यांच्या शुभहस्ते सन्मानाची ट्रॉफी राहनाळ शाळेला देण्यात आली.

'बिऱ्हाड' बालनाट्यामध्ये वंचित, शोषित घटकाचं शिक्षण व्हायला पाहिजे, शिक्षणाची आवड प्रत्येकालाच लागली पाहिजे, त्याचबरोबर जीवन जगत असताना आपल्यावर कितीही संकटे आली तरी त्या संकटावर मात करून आपण आपलं शिक्षण पूर्ण केलं पाहिजे. शिक्षण हाच आपल्या जीवनाच्या उन्नतीचा मूल मंत्र आहे असा संदेश दिला आहे. या बालनाट्याचे लेखन, दिग्दर्शन आणि नेपथ्य राहनाळ शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील, संगीत अंकुश ठाकरे, वेशभूषा संध्या जगताप यांची आहे. बालनाट्यात पूर्वा घारगे हिने पार्वती उत्तम रंगवली आहे. भिमा यश सोंडूलकर, शिवा अर्णव खोपडे, शिक्षिका नेहा झुंजारराव, शिरप्या शौर्य मत्रे , गणऱ्या रोशन राठोड आणि इतर विद्यार्थ्यांच्या भूमिका आहेत.

हे बालनाट्य नुकताच विजयी ठरल्याने गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. पालकांनी आरती ओवाळून मुलांना औक्षण केले. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, विस्तार अधिकारी वैशाली डोंगरे, राहनाळ गावातील समस्त नागरिक, पालक यांनी मुलांचं आणि शिक्षकांचही कौतुक केलं आहे.

# पोलीस मित्र संघाच्या जिल्हाध्यक्षपदी मनोज नायर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण(प्रतिनिधी)

टायगर पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस मनोज नायर यांची निवड करून कल्याण डोंबिवली मध्ये संघटनेचे काम चालू करण्यात आले आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेश फडतरे, महिला प्रदेशाध्यक्ष रश्मी वीर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रवीण पवार यांच्याहस्ते कल्याण डोंबिवली जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. मनोज नायर यांची जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्षपदी राणी सोनवणे यांची तसेच जिल्हा कार्यकारणी नियुक्त करण्यात आली आहे. याप्रसंगी शेखर कदम, उमेश खंडागळे, सुमन सिंग बोलसे, निलेश अंनपर, आप जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जोगदंड, शिवसेना उपशहर प्रमुख हर्षवर्धन पालांडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सचिव देवबा सूर्यवंशी, उद्योजक विक्रांत शिंदे, विजय मोरे, विकास मोरे, गणेश पाबळे, विभागातील नागरिक महिला उपस्थित होते.




# मुंबई-नाशिक महामार्गावर भीषण अपघात

## तीन ठार तर १४ जखमी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी)

मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर गोठेघर जवळ एका उड्डणपुलावर पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला असुन या विचित्र अपघातात एका प्रवाश्याचा जागीच मृत्यू झाला आहे तर दोघांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असुन १४ ते २५ प्रवासी गंभीर जखमी आहेत त्यांच्यावर खाजगी तसेच सरकारी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुंबई -नाशिक महामार्गावर मुबंईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनर,ट्रक,बस,मालवाहु गाडी अश्या चार ते पाच गाड्यांचा एकापाठोपाठ विचित्र भीषण अपघात झाल्याने काही काल वाहतूक कोंडी झाली होती

घटनास्थळी तात्काळ डी.वाय.एसपी मिलिंद शिंदे,पोलिस निरीक्षक जितेद्रं ठाकूर,सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवकुमार जाधव सह महामार्ग पोलीस व शहापूर पोलिस कर्मचारी दाखल झाले असुन अधिक तपास करत आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक,जीवरश्रक टिम सह पोलिसांनी जखमींना उपचारासाठी मदत करुन वाहतूक कोंडी सुरळीत केली.

# शिवसेना उबाठा शिष्टमंडळाने घेतली आरटीओ अधिकाऱ्यांची भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/
कल्याण (कुणाल म्हात्रे )

स्टेशन परिसरातील रिक्षांना शिस्त लावा, मीटरप्रमाणे भाडे आकारणी सुरू करा, शालेय विद्यार्थ्यांच्या बसेसची नियमित तपासणी करण्यासह बेकायदेशीर वाहतूक थांबवण्याची आग्रही मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे कल्याण आरटीओ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांसंदर्भात शिवसेनेचे उपनेते विजय साळवी, जिल्हा संपर्कप्रमुख साईनाथ तारे, शहरप्रमुख सचिन बासरे यांच्यासह शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आज कल्याण आरटीओ कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला.कल्याण शहर झपाट्याने विकसित होत असले तरी शहरातील नागरिकांसाठी वाहतुकीची सोयीस्कर सार्वजनिक व्यवस्था अद्याप उपलब्ध नाही. अनेक रहिवासी हे रिक्षांवर



अवलंबून असून या रिक्षांचे आणि त्यांच्या स्टँडचे सुयोग्य नियोजन करण्याची गरज असल्याचे उपनेते विजय साळवी यांनी कल्याण उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकूल यांच्यासोबत झालेल्या बैठकीत अधोरेखित केली. तसेच कल्याण शेजारील म्हारळ, मुरबाड आदी ठिकाणांहून कल्याणात होणारी सहा आसनी रिक्षांची बेकायदेशीर वाहतूक, त्यामुळे होणाऱ्या अपघातात जाणारे बळी तसेच शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शाळेच्या किंवा खासगी बसेसच्या फिटनेसची तपासणी याकडेही या बैठकीत लक्ष वेधत कारवाईची आग्रही मागणी करण्यात आली. तर कल्याण स्टेशन परिसर संपूर्णपणे रिक्षाचालकांनी व्यापून टाकला असून इतर वाहनांना त्याठिकाणी शिरण्यासही जागा नसते. स्टेशनवरून शेअरिंगनुसार रिक्षा सुटणे हे मान्य आहे मात्र शहरातील इतर ठिकाणांहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी मीटरप्रमाणे भाडे आकारावे, अधिकृत रिक्षा स्टँडची यादी जाहीर करावी, शहरातील शेअर आणि थेट रिक्षाचे दरपत्रक फलक प्रत्येक ठिकाणी लावण्यात यावे. अशावेळी या रिक्षाचालकांचे नियंत्रण आणि नियोजन करण्याचे काम हे प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## मालमत्ता विभाग

**निविदा सुचना क्र. ६/ २०२४- २०२५(दुसरी मागणी)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खाली नमूद केलेल्या वाहनतळाच्या जागा निविदेतील निर्धारीत पार्किंग दराने 'पे अॅन्ड पार्क' या धर्तीवर ३ वर्ष कालावधी करीता चालविणेस देणे कामी अनुभवी इच्छूक व्यक्ती/संस्था यांच्याकडून 'ई-टेंडर' पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | कामाचे नाव | निविदा अनामत रक्कम (१%) | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|
| १ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.) रेल्वे स्टेशन जवळील कै. दिलीप कपोते बांधिव वाहनतळ 'पे अॅन्ड पार्क' या धर्तीवर ३ वर्ष कालावधीकरीता चालविणेस देणेबाबत. | ७,६०,०००/- | रु.१०,०००/- + GST १८% एकुण ११,८००/- |
| २ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.) रेल्वे स्टेशन जवळील बोरगांवकर वाडी वाहनतळ 'पे अॅन्ड पार्क' या धर्तीवर ३ वर्ष कालावधी करीता चालविणेस देणेबाबत. | ५,००,०००/- | रु.१०,०००/- + GST १८% एकुण ११,८००/- |
| ३ | कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे, ठाकुर्ली (प.) रेल्वे स्टेशन जवळील ९० फुटी रोड लगत मोकळ्या जागेवरील वाहनतळ 'पे अॅन्ड पार्क' या धर्तीवर ३ वर्ष कालावधीकरीता चालविणेस देणेबाबत | १,०५,०००/- | रु.१०,०००/- + GST १८% एकुण ११,८००/- |
| ४ | कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे, मौजे- पाथर्ली पाटकर प्लाझा इमारत, चिमणी गल्ली डोंबिवली पूर्व येथील बांधिव वाहनतळ 'पे अॅन्ड पार्क' या धर्तीवर ३ वर्ष कालावधीकरीता चालविणेस देणेबाबत. | ७२,२००/- | रु.१०,०००/- + GST १८% एकुण ११,८००/- |

१) निविदा विक्री व स्विकृती दि. १६/०१/२०२५ ते ०५/०२/२०२५ वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा पूर्व बैठक दि. २३/०१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. आयुक्त महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
३) निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत राहील.
४) शक्य झाल्यास दि. ०६/०२/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता 'ई-टेंडरींग विभाग' नागरीक सुविधा केंद्र येथे उघडण्यात येईल.
५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त महोदया, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवलेला आहे.

सही /-
(रमेश मिसाळ )
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

जा.क्र. कडोंमपा/ जसंवि/मुका/ ५८
दिनांक- १५/०१/२०२५


# रक्त तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

मुरबाड तालुक्यातील नामवंत कनिष्ठ महाविद्यालय जनसेवा शिक्षण मंडळ, मुरबाड संचलित विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, शिवळे तसेच बबनराव ढोकळे शिक्षण व संशोधन संस्था, पुणे संचलित आदर्श पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट, मुरबाड यांच्या संयुक्तमाने विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिवळे येथे इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी रक्त तपासणी व करिअर मार्गदर्शन शिबिर ठेवण्यात आला होता. या शिबिरात सुमारे ३०० विद्यार्थांनी सहभाग नोंदवला. विद्यालयाचे प्राचार्य वाय. डी.धलपे यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. तसेच इन्स्टिट्यूटच्या प्राध्यापिका सौ. लक्षिता भांडे यांनी पॅरामेडिकल फील्डमध्ये असणाऱ्या करिअरच्या विविध संधी याबद्दल मार्गदर्शन केले.

या शिबिरात सुमारे १५० विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासले गेले. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट्स वाटण्यात आले.

जनसेवा शिक्षण मंडळाचे संचालक बी. एम.पवार यांनी विशेष सहकार्य केले.

प्रा एल. एन. भांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवण्यासाठी वाचन उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

एकीकडे मोबाईलमुळे वाचनाची कमी झालेली सवय पुन्हा रुजवण्यासाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी कल्याणच्या के.एम. अग्रवाल महाविद्यालयात अनोखा वाचन उपक्रम राबवण्यात आला. ज्यामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांसह विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोबाईलच्या केवळ वापराचे नव्हे तर अतिवापराचे अनेक दुष्परिणाम दिसू लागले आहेत. ज्यामध्ये शारीरिक, मानसिक आणि त्याचसोबत सामाजिक धोकेही समोर येऊ लागले आहेत. या सामाजिक धोक्यांपैकीच एक आणि सर्वात महत्त्वाचा असणारा म्हणजे लोकांचे कमी झालेलं वाचन आणि परिणामी लोप पावत चाललेली आपली वाचन संस्कृती. आपल्या समाजाच्या प्रगल्भतेला, विचारांना योग्य ती दिशा देण्याचे काम आतापर्यंत या वाचन संस्कृतीने केले आहे. मात्र माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचंड रेट्यात ही वाचनाची आवड आणि संस्कृती काहीशी घसरली आहे.

नेमका हाच धागा पकडून कल्याणातील के.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता मन्ना यांच्या पुढाकाराने



के. एम. अग्रवाल महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत प्राध्यापक आणि अनेक विद्यार्थ्यांचा सामूहिक वाचन उपक्रम राबवण्यात आला. ज्यामध्ये अग्रवाल महा विद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेची अनेक नामांकित लेखकांची दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. अग्रवाल महाविद्यालयातील एफ. वाय, एस.वाय, टी.वायचे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, सेल्फ फायनान्स विषयाच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सतत मोबाईल फोन वापरणारी ही युवा पिढी आज पुस्तक वाचानांमध्ये एकदम दंग झाली होती.

पुस्तक वाचनाचा हा आनंद खरोखर अतिशय निर्मळ असल्याची प्रतिक्रिया या विद्यार्थ्यांनी दिली. तर विद्यार्थ्यांमध्ये ही वाचनाची आवड रुजविण्यासाठी असेच विविध उपक्रम यापुढेही सुरू राहणार असल्याची माहिती उपप्राचार्य डॉ. अनघा राणे यांनी दिली. तसेच महाविद्यालयामध्ये व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने वाचन कट्टा हा उपक्रम राबवण्याचा मानस आहे, त्यादृष्टीनेही येत्या काळात विविध कार्यक्रमांची आखणी केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या वाचन उपक्रमामध्ये महा विद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अनघा राणे, उप प्राचार्य डॉ. संतोष कुलकर्णी, ग्रंथपाल आशिष कमाविसदार, मराठीच्या प्रा.मीनल सोहनी, डॉ. प्रल्हाद पवार, प्रा. अर्पिता कुलकर्णी, मानसी बर्वे, डॉ. अमित पंडीत, डॉ. जयश्री शुक्ला, डॉ. वैशाली पाटील, प्रा. रोहिदास सानप, प्रा. प्रज्ञा कदम, सीमा जाधव, डॉ. रुपेश दुबे, अजय पाषाणकर, डॉ. किरण चव्हाण, ग्रंथालय कर्मचारी सुहास भगत आणि बाळासाहेब मोरे हेदेखील सहभागी झाले होते.

# तीन बांगलादेशी महिला घुसखोर पोलिसांच्या ताब्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

घुसखोरी करून कल्याण- डोंबिवली परिसरात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरोधात पोलिसांची धरपकड मोहीम सुरु आहे. या कारवाईत डोंबिवली मानपाडा पोलिसांनी डोंबिवली तील कोळेगाव परिसरातून तीन बांग्लादेशी महिलांना अटक केली आहे. मागील अनेक दिवसांपासून या महिलांचे परिसरात वास्तव्य असल्याचे सांगण्यात येत आहे. डोंबिवलीच्या कोळेगाव परिसरात पाटील चाळीत या तीन महिला वास्तव्यास होत्या. या महिलांच्या वास्तव्याबाबतची माहिती मानपाडा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकत या तिन्ही महिलांना ताब्यात घेतले आहे. त्यांची चौकशी केली असता पोलीस तपासादरम्यान या महिलांना मजुरीच्या कामासाठी आणल्याची माहिती पुढे आली आहे.

यात महिलांसोबत आणखी कोणी आहे का? त्यांना कुणी आणले आणि त्यांचे बेकायदेशीर प्रवेश कसे झाले? याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. तसेच त्यांच्याकडील सर्व कागदपत्रांची तपासणी देखील करण्यात येत आहे. यामुळे पोलीस तपासात काय समोर येथे हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# रेणुका विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
झिडके-अंबाडी(प्रतिनिधी)

भिवंडी तालुक्यातील रेणुका विद्यालय झिडके येथील एस्.एस्.सी.च्या सन-१९८१/८२ वर्गातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन सावरोली येथील पिंगारा फार्म हाऊस येथे नुकतेच आयोजित करण्यात आले होते.या स्नेहसंमेलनाठी जवळपास एकूण ३८ माजी विद्यार्थ्यांची आवर्जुन उपस्थिती होती.

या स्नेहसंमेलनाचा मुख्य उद्देश असा की,तत्कालीन शालेय विद्यार्थी जीवनातील काही बरेवाईट प्रसंग,घटनाक्रम काही सुखद अनुभव आपल्या मित्रपरिवार यांच्याकडून कथन केला जातो,त्याचबरोबर जुन्या आठवणींना उजाळा देऊन स्नेहसंबंध वृद्धिंगत करणे.गेल्या सहा वर्षांपासून आणि विशेषतः रेणुका विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांपैकी सन-१९८१/८२ या वर्षांतील एस्.एस्.सी.विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या स्नेह संमेलन या उपक्रमाचे प्रथम मानकरी म्हणून ही बॅच ठरत आहे.या उपक्रमाचे अनुकरण याच विद्यालयातील जेष्ठ व कनिष्ठ माजी



विद्यार्थ्यांकडून हा उपक्रम आयोजित करण्यात येत आहे,ही अभिमानास्पद बाब म्हणता येईल.या स्नेहसंमेलन उपक्रमाचे नेतृत्व मित्रपरिवारातील परममित्र ठाणे शहरातील सुप्रसिद्ध व्यवसायिक राजू दत्तात्रय पाटील गेल्या सहा वर्षांपासून सुनियोजनबद्ध करीत आहेत,त्यांना इतर मित्रपरिवार यांचेही सहकार्य लाभत आहे.१९८१/८२ जवळपास ४२ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अशा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करणे म्हणजे एक सामाजिक आचार विचारांची देवाणघेवाण करणे असाही मूळ उद्देश यापाठीमागे आहे.

सदर स्नेहसंमेलन कार्यक्रम सकाळी ९.३० वाजेपासून ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला होता.यावेळेस उपस्थित मित्रपरिवारापैकी विजय गायकवाड,अविनाश जाधव,भारती पाटील,नौशाद पटेल,प्रमोद भोईर, मिलिंद भोईर,कल्पना पाटील,पंढरीनाथ पाटील,डॉ.अविनाश पाटील,राजू पाटील,गणेश पाठारी,काथोड पाटील,अरूणा पाटील,आदिंनी आपली मनोगते व्यक्त केली. हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी गणेश पाठारी,काथोड पाटील,संभाजी लाटे,भारती पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. या ठिकाणी आवर्जुन उल्लेख करता येईल की,या सन-१९८१/८२ एस्.एस्.सी. बॅच मधील माजी विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर,प्राध्यापक,प्राचार्य,सहायक आयुक्त, पत्रकार,शिक्षक,आरोग्य, महसूल खात्यातील कर्मचारी,व्यवसायिक या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आपले नाव लौकिकास पात्र असेच आहेत,त्यामुळेच रेणुका विद्यालयाचे नाव मोठे करण्यात या बॅचचा नामोल्लेख नाकारता येणार नाही,हे स्पष्टच आहे. अशा प्रकारे अत्यंत आनंदमय व निसर्गरम्य ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहसंमेलनाचा उत्साह अगदी वेगळाच असा उल्लेख करता येईल,या स्नेहसंमेलनात चहा,नाश्ता,आईस्क्रीम,व आवडीचे व्हेज,नॉनव्हेज अशा प्रकारच्या स्नेहभोजनाचा आस्वादही बऱ्या पैकी घेण्यात आला. एकंदरीत सुनियोजनबद्ध अशा या स्नेहसंमेलनाचा आनंद अवर्णनीय असाच सांगता येईल.

# डॉ. हेमाली करपे 'आयुरकॉन आयुर्वेद एक्सलेंस' पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(ऋषीकेश जाधव)

पालघर / भारतीय राष्ट्रीय आयुर्वेद महासम्मेलन नवी दिल्ली यांची महाराष्ट्र राज्य शाखे द्वारे १२ जानेवारी २०२५ रोजी गोविंदराव आदिक सभागृह, श्रीरामपूर या ठिकाणी आयोजित 'राष्ट्रीय आयुर्वेद परिसंवाद आयुरकॉन २०२५' या कार्यक्रमात नालासोपारा आयुर्वेद मेडिकल कॉलेजच्या माजी विद्यार्थीनी डॉक्टर हेमाली गोपाळ करपे यांना आयुर्वेद संमेलन महाराष्ट्र चे अध्यक्ष डॉक्टर सतीश भट्टड, सचिव डॉक्टर ऋजुता दुबे, सीईओ (PIRENS) डॉक्टर सुप्रिया विखे पाटील आणि डॉक्टर सुचित्रा भट्टड या मान्यवर यांच्या हस्ते 'आयुरकॉन आयुर्वेद एक्सलेंस अवॉर्ड २०२५ ' प्रशस्तीपत्र कलश स्वरूप पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सर्वसामान्य




समाजातील लोक राहत असलेल्या नालासोपारा- विरार- वसई ता. वसई जिल्हा पालघर सारख्या ग्रामीण, बंदरपट्टी, डोंगराळ भागात आयुर्वेदाचा प्रचार - प्रसार करीत, अनेक वर्षांपासून रुग्णसेवे मध्ये महत्त्वपूर्ण असे योगदान डॉ. हेमाली गोपाळ करपे यांनी दिले आहे. त्यामुळे त्यांना हा सत्कार देऊन त्यांच्या पुढील कार्याला एकप्रकारे उर्जा प्राप्त होणार आहे.

नालासोपारा. ता. वसई जि. पालघर या आयुर्वेद मेडिकल कॉलेजचे सर्व अध्यापक, अध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांकडून तसेच नालासोपारा मेडिकल असोसिएशन, नालासोपारा डॉक्टर्स फोरम, वसई तालुका आयुर्वेद ग्रॅज्युएट वेल्फेअर असोसिएशन व नालासोपारा वसई विरार परिसरातील सर्व जनतेकडून त्यांचे गोड कौतुक करीत अभिनंदनीचा वर्षाव करण्यात येत आहे. डॉ. हेमलता शेंडे - प्राचार्या नालासोपारा आयुर्वेद मेडिकल कॉलेज, नालासोपारा यांच्या कडून, डॉ. हेमाली करपे यांचे अभिनंदन करीत पुढिल कार्यासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी